**प्रेस नोट ता. २४/०३/२०२५**


**भोलेनाथ उर्फ भोला बलभिम हावळे सोलापूर व धाराशीव जिल्हयातून ०२ वर्षाकरीता तडीपार**

इसम नामे, भोलेनाथ उर्फ भोला बलभिम हावळे, वय-२४ वर्षे, रा. हांडे प्लॉट, मुख्याध्यापक भवन समोर, जुना पुना नाका, सोलापूर याचेविरुध्द सन २०२० व २०२४ या कालावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा व मारामारी करणे, महिला अत्याचार तसेच अनुसूचित जाती अनुसूचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द जोडभावी पेठ पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने श्री विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांनी कार्यवाही करुन, त्यांचेकडील तडीपार आदेश क्र.६३०/२०२५ दि.१३/०३/२०२५ अन्वये, इसम नामे, भोलेनाथ उर्फ भोला बलभिम हावळे, वय-२४ वर्षे, रा. हांडे प्लॉट, मुख्याध्यापक भवन समोर, जुना पुना नाका, सोलापूर यास सोलापूर व धाराशीव जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे. त्यास तडीपार केल्यानंतर ठाणे येथे सोडण्यात आलेले आहे.

**( एन. एस. कानडे)**
**पोउपनि,वाचक अधिकारी,**
**पोउपआ परिमंडळ कार्या.सोलापूर शहर.**

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner